
१६५५
०१०२



REFBK-0014066
REFBK-0014066

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३७८५७ दि: ९।०२१.
क्रमांक १६५५५ नोंद दि: ३.३.६५

# शब्दुली

१८०६६

रामदास र. प्रभु

REFBK-0014066
REFBK-0014066

सागर साहित्य प्रकाशन, मुंबई
मूल्य : दोन रुपये

© रघुनाथ यशवंत प्रभुगांवकर

●

प्रथमावृत्ति :
८ मे १९६४

●

मुखपृष्ठ :
दीनानाथ दलाल

●

मुद्रक :
चिंतामण वा. जोशी
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग–कुलाबा

●

प्रकाशक :
सागर साहित्य प्रकाशन
१४ त्रिभुवन रोड
मुंबई ४.

ज्यांचा आशीर्वाद नेहमींच माझ्या पाठीशीं आहे, ते

**श्री. बा. द. सातोस्कर**

यांसी--

# अनुक्रमणिका :


| | |
|---|---|
| प्रास्तविक : अनंत काणेकर | ६ |
| ओळख : प्रभाकर अत्रे | ८ |
| आभार | १६ |
| फुलारावी राका | १७ |
| बांग | १९ |
| मायभूमिला जाशिल कां ? | २० |
| गा कविराया– | २२ |
| जगायचें ' उद्यां 'साठीं | २४ |
| मुसाफिर मीं– | २६ |
| कृष्ण काजळी रात | २७ |
| निर्मितीचे रावे | ३० |
| मूल | ३१ |
| विजनवास | ३१ |
| तुझ्याचसाठीं | ३२ |
| माझें गोव्यांत माहेर | ३३ |
| प्रतिज्ञा | ३५ |
| ही जत्रा | ३६ |
| स्वप्न | ४१ |
| माझ्या या घरांत | ४२ |
| चैत्र माज– | ४३ |
| नको शापूंस माऊली | ४४ |
| विश्वाचा कोश | ४६ |
| चंचल ? | ४७ |

| | |
|---|---|
| किती पाहूं वाट | ४८ |
| वाऱ्यावरच्या भंवरा | ४९ |
| स्वतंत्रते तुजसाठीं | ५० |
| रेशीम धागा | ५१ |
| अंकुर | ५२ |
| एकच रेखा | ५४ |
| एकच उणीव | ५५ |
| पुण्य आणि पाप | ५६ |
| जीवनस्मृतिची मधुर सांठवण | ५७ |
| कातरवेळ | ५८ |
| आकाशाचे अश्रु पिऊन | ५९ |
| तुझी याद येते | ६० |
| सारस्वत तूं | ६१ |
| कोण तूं स्वैरिणी ? | ६२ |
| जिथें मांडवी...जिथें जिव्हाळा | ६३ |
| हंसणारे हंसूं देत | ६४ |

## प्रा. काणेकर म्हणतात----

**अनादिकालापासून** अनेक सत्कवींना स्फूर्ति देणाऱ्या विषयांनीच श्री. रामदास प्रभु या गोमन्तकाच्या तरुण कवीला स्फूर्ति दिली आहे. प्रेम, आशा, ध्येय यांची कधींच पूर्ति होत नाहीं असें कुसुमाग्रज आपल्या एका सुंदर कवितेंत म्हणतात; आणि तरीहि आपण या भंगणाऱ्या मूर्तींचें पूजन करतों असें त्यांचें मत आहे. हें अगदीं खरें आहे. प्रत्येक चांगल्या कवीनें या जुन्या जुन्या वाटणाऱ्या अनुभवांवरच चांगल्या चांगल्या नव्या कविता केलेल्या आहेत. श्री. रामदास प्रभु याला अपवाद नाहींत.

त्यांची 'नको शापूस माऊली' ही कविता मी किती तरी वेळां वाचली. प्रत्येक खेपेला नवा आनंद झाला. या सुंदर कवितेंतल्या अनुभवाची सूक्ष्मता आणि अभिव्यक्तींची तरलता वेधक आहे. तिच्यांतला हृद्यंगम ध्वनि वर्णन करून मी नष्ट करणार नाहीं. त्या कवितेच्या प्रारंभीच्या आणि शेवटच्या कांहीं ओळी इथें उद्धृत करतों. या वानगीवरून रसिकांना कवितेच्या सौंदर्याची कल्पना येईल.

" त्याच्या वासनांचें फळ
भुंगा गेला लांबवर
फूल कुणाचें कुणाचें
चल वेलीस विचार.

... ... ...

तुझ्या उच्छ्वासाची धग
लंका सोन्याची जाळील

गर्भवतीच्या शापानें
कोंभ कोंभ करपेल
तुझ्या शब्दांत सामर्थ्य—
अहिल्येच्या सुकृतांचें
नको शापूंस माऊली
पुण्य आटेल पिढ्यांचें ! ”

‘ जगायचें ‘ उद्यां’साठीं ’ मधील काळोख्या ‘ आज’च्या पोटांतील ‘ उद्यां’च्या स्वप्नांचें वर्णन करतांना कवि म्हणतात,

“ ... ... ...
ऐन चैत्रांत पिंपळ
जीवनाला विटलेला
मंदिराची जवळीक
तरी चांफा रोडावला
... ... ...
वाट ओढीत चालली
मोडलेल्या कंबरेला
कुणी तरी डिचवलें
धांवणाऱ्या नागिणीला
... ... ...
नभ गर्भार जपतें
स्वप्न अंतरीं उषेचें
म्हणून ही धडपड
स्वप्नासाठीं जगायचें !
जगायचें ‘ उद्यां ’साठीं
‘ उषे ’साठीं जगायचें
पिकलेलें पान जसें
एक दिन गळायचें ! ”

९४०६६

भारत स्वतंत्र झाला, महाराष्ट्र स्वायत्त झाला, तरी गोमंतक परदास्यांत खितपतच पडला होता. 'मायभूमिला जाशील का ?' या कवितेंत 'मेघदूता'चा सुंदर संदर्भ घेऊन कवि म्हणतात,

हे यक्षाच्या मेघा माझ्या
मायभूमिला जाशिल का ?
प्रेमळ मित्रा ! या हृदयाची
तळमळ तिजला कथिशिल का ?
परसत्तेच्या भयाण पंजरिं
जाउन मित्रा तुजवीण
कुढणारें मन कोण सांग रे
दाविल तिजला उकलून ?
... ... ...
धडपडतें मन तळमळतें अन्
दुर्बलता परि जाणवते
चमकुनि जातां वीज अचानक
ग्लानि अनामिक क्षण येतें !
मात करीलच या ग्लानीवर
उधाणलेली नव दीप्ती
मातृभूमिला अर्पुन जीवन
मिळविन निश्चित अन् तृप्ती !"

शेवटीं गोमंतक स्वतंत्र झाला तेव्हां कविच्या मुखांतून सहजोद्गार निघाले,

"गोवा माझा स्वतंत्र झाला
स्वतंत्र झाला ! स्वतंत्र झाला !!
... ... ...
जिथली माती प्रसाद मजला
गोवा माझा स्वतंत्र झाला !

प्रसन्न सुंदरतेचा राजा
कलावंत गोमंतक माझा
जिथें जिव्हाळा...ओढ जिवाला
गोवा माझा स्वतंत्र झाला ! ”

या कलावंत गोमंतकांतले उदयोन्मुख कवि श्री. रामदास प्रभु यांनीं एकाहून एक प्रसन्न आणि एकाहून एक सुंदर कविता लिहाव्या, असेंच कुणीहि रसिक म्हणेल.

—अनंत काणेकर

२८ एप्रिल ११६४

# ओळख

श्री. रामदास प्रभु यांचा माझा परिचय होऊन सात आठ महिने झाले. त्यांचें सेवेचें क्षेत्र वेगळें आहे. माझें वेगळें आहे. ते निसर्ग श्रीमंत गोव्यांतले तर मी नाशिकचा ! नाशिकला नदी असली, घाट असले, घाटावर देवळें असलीं आणि नासिक 'फेम' भांड्यांचीं दुकानें असलीं तरी निसर्ग रमणीयता हें कांहीं नाशिकचें खास असें वैशिष्ट्य नव्हे. प्रभूंचे सामाजिक कार्याचें क्षेत्र निराळें व माझें निराळें ! त्यांच्या माझ्यांत 'समवयस्कता'ही नाहीं. पण तरीही आम्हीं जणुं ब्याच वर्षांचे स्नेही आहोंत असे एकत्र आलों आहोंत. कलेच्या क्षेत्रांत जात, पात, वय, धर्म, नौकरीपेशा हे भेद कधींही आडवे येत नाहींत. प्रभु आणि माझी कलेची रास एक आहे. त्यांना 'शब्दांचे' वेड आहे, चित्राचे वेड आहे, कवितेचें वेड आहे, संगीताचें वेड आहे. निसर्गांतून हुंकारणाऱ्या 'अमरा'चें, 'सनातना'चें वेड आहे. त्यांना गोव्याच्या मातींतून हें कला-वेड मिळालें आहे. तें वेड त्यांनीं जपलें आहे. संस्कारित होऊं दिलें आहे. त्या वेडाची 'जात'च मुळीं वेगळी आहे. त्यामुळेंच चित्रांत रमणारे प्रभु कवितेंतही अनुभवांचीं, भावांचीं सुंदर चित्रें रेखाटून जातात. फोटोग्रफींत रमणारें त्यांचें मन निसर्गांतली विविध छायाचित्रें शब्दांकित करतांनाहि रंगून जातें. त्यांच्यातल्या ह्या कलावेडानें मला आणि त्यांना जवळ आणलें आहे. त्यांच्या आणि माझ्या सहवासांत रसिकतेची देवाणघेवाण खूप झाली आहे. त्यांच्या कविता मी एकल्या आहेत. आणि त्या एकत

अनुक्रम......३७९५७...... दि: ......०१।०५।..
क्रमांक ......१६५५......... नोंद दि ......३।३।६७

असतांना त्यांना योग्य वेळीं व योग्य ठिकाणीं मी ' दाद 'ही दिली आहे. दोघांच्या ठिकाणीं काव्याचें मन आणि कान आहेत हा आम्हांला एकत्र आणणारा महत्त्वाचा दुवा ! त्या स्नेहापोटींच हें " मित्र कर्तव्य " करीत आहे.

श्री. रामदास प्रभु यांचा हा पहिलाच कवितासंग्रह ! श्री. प्रभु यांनीं कथालेखन, माहितीवजा गद्यलेखन केलेलें असलें तरी त्यांची मूळ प्रकृति कवीचीच ! कवितेवर त्यांचें अपार प्रेम आहे. भक्ति आहे. त्यामुळें त्यांनीं कविता खूप वाचली आहे—अभ्यासली आहे. आणि चांगला लेखक हा आधीं चांगला वाचक असावा लागतो ह्या अनुभवसत्याची त्यांना जाणीव आहे. चांगल्या काव्यवाचनाची साक्ष त्यांच्या प्रस्तुत कविता संग्रहांतील कवितांत काव्याच्या माध्यमावर त्यांचे जें ' प्रभु ' त्व दिसते त्यांतून मिळते.

श्री. प्रभु गोव्याचे ! गोव्याविषयीं त्यांना प्रेम आहे. बा. भ. बोरकर यांच्या कवितेवर त्यांची भक्ति आहे. रंग आणि गंधाचे प्रभावी आकर्षण बोरकरांना आहे तसेंच तें प्रभूंनाही आहे. कवि आणि प्रीति ह्यांचेंही नातें असेंच ' अजरामर ' मानलें जातें. प्रभूंच्या प्रतिभेलाही प्रीतीचें आकर्षण आहे. पण केवळ निसर्ग, प्रीति, देशभक्ति, गोवा प्रेम या विषयावरच ती थांबत नाहीं. ती त्यापलिकडचें जें ' सूक्ष्म ' आहे त्याचा वेध घेतांनाही ती येथें दिसते. आणि ह्या सूक्ष्माचा वेध घ्यायला माणसाजवळ ' अंतर्मुख ' होण्याची वृत्ति लागते. ती श्री. प्रभूंच्या जवळ आहे ह्याचा मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. **बांग, ही जत्रा, जगायचें ' उद्यां ' साठीं, कृष्ण काजळीरात, स्वप्न, विश्वाचा कोश, अंकुर, पुण्य आणि पाप** ह्या कवितांचा ह्या संदर्भात उल्लेख करायला हवा. विशेषतः **कृष्ण काजळीरात, स्वप्न, अंकुर, पुण्य आणि पाप** ह्या कवितांचा खास गौरव करायला हवा.

मी पाहिलें, समोर झगझगीत प्रकाशांत
लावण्यसंपन्न असें ' पुण्य ' उभें होतें
लगेच शरमेनें मी मान खालीं घातली
कारण--
कां कुणास ठाऊक, पुण्याकडे पाहतांना
माझ्या मनांत
पाप आलें--

असें ' पाप आणि पुण्य ' कवितेंत कवि म्हणतो. या ठिकाणीं ' पाप आणि पुण्य ' ह्या दोन्हीं कल्पना एकाच ठिकाणीं कशा संभवतात-संमीलित होतात हें ध्यानीं येतें. अखेर ही भूमी एकच ! आपलें मन ही ती भूमी ! विचार आणि विकार, पाप आणि पुण्य ह्या दोघांना स्वतःतच सामावून घेणारी !

जीवनाचा असाच सूक्ष्म अनुभव **' विश्वाचा कोश '** मध्यें व्यक्त झाला आहे. स्वतःचें जीवित कार्य जणुं कवि सांगतो आहे. जीवनांतले सारे बरेवाईट अनुभव पचवून त्याची वैखरी—

आणि आज माझी वैखरी
ॐ कारांतून रुजतें आहे
उमलविण्यासाठीं उन्मेषाचे मळे
विषाचे खत घालून
अमृताची फुलबाग फुलविणारा
मी माळी आहे.
आज मी विश्वांत असून
विश्वाच्या बाहेर आहे
विश्वाहून वेगळा आहे.

ही जाणीव व्यक्त करीत आहे.

' स्वप्न ' ही कविता कवीच्या चिंतनशीलतेची द्योतक आहे. जीवन पुन्हां पुन्हां नवें रूप, नवा आकार घेतें- आणि पाहात

‘ स्वप्नें ’ फक्त स्वप्नेंच !

अनेकविध स्वप्नें अखेर
पहातां पहातां विरतात
वारा होऊन जातात
आणि हातांत—— ।

हातांत उरतो वाराच । पण प्राण मात्र वेडा
शोधतो नवीन शरीर—— नवीन स्वप्नें पाहण्यासाठीं ।

सर्वच कवितांच्या ओळी विस्तार भयास्तव देत नाहीं. पण श्री. प्रभु यांची प्रकृति जीवनांतल्या विविध प्रवृत्तींचा, विविध अनुभवांचा कांहीं अन्वयार्थ शोधतांना दिसते हें पाहूनच मन आनंदतें. वस्तुतः त्यांच्या वयाच्या दृष्टीनें विचार केला तर त्यांचें हें चिंतनशील मन अधिकच मोहवितें. ‘ **ही जत्रा** ’ कविता हें या संग्रहाचें प्रमुख आकर्षण मानलें जाईल.

गोव्याविषयींच्या कविता या संग्रहांत आहेत. पण त्यांत फारच स्थूल स्वरुपाचे विचार आले आहेत. गोव्याच्या स्वातंत्र्य-लढ्याशीं जवळून संबंध येऊनही श्री. प्रभु ह्यांची ह्याविषयींची एकही कविता आपला खास ठसा उमटवून जात नाहीं. ‘ **माझें गोव्यांत माहेर** ’ **स्वतंत्रते तुजसाठीं, जिथें मांडवी** ह्या कविता ह्या विभागांत बसतात. वास्तविक अत्यंत संस्कारक्षम अशा ह्या कवीच्या काव्यांत गोव्याचें शब्दरुप दर्शन घडलें असतें तर वाचकाला अधिक समाधान झालें असतें. **खास निसर्गपद** अशाही कवितांची उणीव मनाला जाणवतें. निसर्ग अजिबातच नाहीं असा मात्र याचा अर्थ नव्हे. निसर्गांतील रंगांचें सौंदर्य कांहीं कवितांतून जाणवतें.

कविवर्य बा. भ. बोरकर यांची कोंकणी मराठी वादांतील मतें वादविषय झालीं असलीं तरी ‘ कवि बोरकर ’ हा विषय मात्र वादातीत आहे असें निदान मी तरी मानतो. त्यांच्या कवितेचा

मी भक्त आहे. त्यामुळेंच '**गा कविराया**' ही कविता जेव्हां मी प्रभूंच्या तोंडून प्रथम ऐकली तेव्हां मी खूप मी आनंदलों. बोरकरांच्या कवितेचीं खास वैशिष्ट्यें ह्या कवितेंत फार चांगल्या शब्दांत मांडली आहेत.

तव कवनांचे सान्द्र मधुर स्वर
कोरिति लेणी कणांकणांतुन
सौंदर्याचा साक्षात्कारच
असें शिल्प निर्मीत रहा.

—

रोमांचित तनु तृषार्त मानस
तव किंभयेंचा सोय सुधारस—
अनुपम, अमृत कविराया तूं
भरुनि घडे पाजीत रहा—

ही संपूर्ण कविता मनाच्या तृप्त अवस्थेंत श्री. प्रभु यांनी लिहिली आहे हें जाणवतें. '**नको शापूंस माऊली**' ही कविता देखिल आपला ठसा मनावर कोरून जाते. प्रियकरानें डाव साधला आणि मग तो डाव उधळून पळून गेला. त्याचा गर्भ प्रेयसीच्या उरीं वाढतो आहे. 'पाप' ह्या कल्पनेनें ती भारावून-भेदरून गेली आहे. 'गर्भपात' ही एकच कल्पना एखाद्या पिशाच्चा-सारखी तिच्या मनावर स्वार झाली आहे. अशा स्थितींत कवि तिला जो विचार सांगतो तो विचार म्हणजे प्रस्तुत कविता! ह्या कवितेंतल्या कांहीं कल्पना खरोखरच फार हृद्य आहेत.

नको म्हणूं पाप त्यास
वेध जिथें फुलण्याचे
स्वप्न गर्भात उद्यांच्या
उगवल्या प्रेषिताचें

वेदनेच्या अंकुरास
आशिर्वाद अनंताचा
आसवांतून स्वातीच्या
मळा नक्षत्र मोत्यांचा

मनाचा एक वेगळा अविष्कार इथें भासतो–दिसतो आणि मनाला बरें वाटतें. कांहीं प्रीतिविषयक कविताही प्रस्तुत संग्रहांत आहेत. **' विरहिणी प्रीति '** ही अधिक उत्कटतेनें व्यक्त होते.

उदासीनता व्यक्तविणारी
कविता असते अतीव सुंदर, अतीव कोमल

असेंच ह्या संदर्भात म्हणतां येईल. **हंसणारे हंसूं देत, तुझी याद, जीवनस्मृतिची मधुर सांठवण, एकच उणीव,** इत्यादि कविता खास वाचनीय !

श्री. रामदास प्रभू यांच्या काव्यगुणांचा परिचय येथवर करून दिला आहे. श्री. प्रभु कविता गुणगुणत लिहितात. त्यामुळें रचनेची सहजता त्यांच्या कवितेंत आहे. शब्दांचे प्रभावी आकर्षण त्यांना आहे. त्यावर त्यांची भक्ति आहे. परंतु शब्द–गुळगुळित-नादमधुर–गोडव्याचे शब्द म्हणजे केवळ कविता नव्हे. त्या शब्दांतून अखेर भाव व्यक्त झाले पाहिजेत. सूक्ष्म, संघर्षमय, भावना हलवून सोडणारे ! काव्य म्हणजे शब्दांच्या माध्यमांतून व्यक्त झालेली समर्थ भावना ! आणि तिचेंच महत्त्व अधिक ! प्रभूंची वाटचाल योग्य दिशेनें चालू आहे. परंतु धोक्याचा लाल कंदिल म्हणून 'केवळ शब्दच नको' असें सांगावेंसें वाटतें. श्री. प्रभु यांजपुढें उदंड भविष्यकाळ आहे. वय लहान असलें तरी त्यांची उमेद मोटी आहे. चण लहान असली तरी मन मोठें आहे. विशाल अनुभव त्यांनीं टिपले व शद्बबद्ध केले पाहिजेत. माझ्यासारखा त्यांचा स्नेही ह्यापेक्षां दुसरें काय मागणार ?

गा मित्रा, तूं गात रहा !

—**प्रभाकर अत्रे.**

# आभार

'शब्दुली' हा माझा पहिला कविता संग्रह ! स्वतंत्र गोमंतकांत भरणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्तानें तो प्रकाशित होत आहे हें माझें भाग्य ! या संग्रहासाठीं ज्यांनीं ज्यांनीं मला सहकार्य दिलें त्या सगळ्यांचा मी ऋणी आहे.

ज्यांनीं प्रारंभकाळांत मला धीर आणि सहकार्य दिलें ते श्री. व्यं. ना. नाईक; अत्यंत कलात्मक छपाई अल्प वेळांत करून दिली ते माझें सुहृद माधव प्रिंटिंग प्रेसचे चालक श्री. चिंतामणराव जोशी; ज्यांचे उपकार आभार मानून कधीं फिटणार नाहींत ते काणे कुटुंबीय, माझे मित्र शांताराम नायक; श्रीकृष्ण वणझारी; अनेक व्याप असून देखील ज्यांनीं 'प्रास्ताविक' लिहून दिलें ते आदरणीय श्री. अनंत काणकर; माझ्या काव्याची जिव्हाळ्यानें ज्यांनीं 'ओळख' करून दिली ते मित्रवर्य प्रभाकर अत्रे; माझी शब्दरूप शब्दुली रेखांकित करणारे चित्रश्री दिनानाथ दलाल; तसेंच श्री. ज. द. सातोस्कर या सर्वांचे आणि ज्या ज्या अनामिकांचे मला बहुमोल साहाय्य लाभलें त्या सगळ्यांचे आभार मानलेलें त्यांना आवडो न आवडो पण त्यांच्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं मला मिळालेली ही पहिलीच संधी आहे.

कुळागराच्या सावलींत फुलणाऱ्या शब्दुलीचीं फुलें मला फार आवडतात. गंधहीन पण नाजूक, सुबक अशीं तीं फुलें !

माझ्या या शब्दुलीला वास असल, नसेलहि ! परंतु मराठी काव्य रसिकाला, कविवर्य तांबेंच्या शब्दांत एवढीच विनंती आहे कीं जरी त्यांना वास नसला तरी देखील—

**कुस्करूं नका हीं सुमनें !**

# फुलारावी राका

तुजसाठीं माझी
फुलावी शब्दुली
पहातें वाटुली
पिसावून

पूजेचें साहित्य
घेऊन हातांत
उभी मी दारांत
खोळंबून

कुठें तूं ! कुठें तूं !
विचारूं मी कोणा
तुझिया दर्शना
आसावलें

येईं हे धांवून
तेजांत न्हाऊन
वसंत होऊन
येईं येईं

नक्षत्र फुलांची
करीत खैरात
विश्व उजळीत
येईं आतां

कोमावली वेल
पुन्हां पालवावी
आणि ऐकूं यावी
हांक तुझी

तुझिया चरणीं
सर्वस्व ओपून
जावें हारपून
आनंदांत

जिथें जिथें तुझें
पडेल पाऊल
कोंभ उमलेल
उन्मेषाचा

वंदूनियां राही
फुलारावी राका
राहीचा हा हेका
पुरवावा

## बांग–

अज्ञेयांतुन बांग येते
पेंगणाऱ्यांना जाग येते
कळी सूर्यफुलाची पूर्वेस उमलते

पाकळी पाकळींतून
प्रकाशाची उधळण
तेजाच्या प्रेरणेनें
वितळतो कणकण

अशी चैतन्याची लाट
चराचरास व्यापीत
उफाळून चालली विश्वांत

वेगळें अस्तित्व त्यांत
तुझें–
शोधूं मी कोठें
शोधूं मी कोठें

अज्ञेयांतून बांग येते

※ ※ ※

... एकोणीस

# मायभूमिला जाशिल का ?

हे यक्षाच्या मेघा माझ्या
मायभूमिला जाशिल का ?
प्रेमळ मित्रा ! या हृदयाची
तळमळ तिजला कथिशिल का ?

परसत्तेच्या भयाण पंजरिं
जउना मित्रा तुजवीण
कुढणारें मन कोण सांग हें
दाविल तिजला उकलून ?

मनू बदलले नव्या युगाचे
नभीं नगारे निनादले
आणि नवनवे पहांट-तारे
पूर्व पटावर प्रकाशले

डाग शशीचे हाय ! मुक्त कुणि
नाहिं पुसाया परि शकलें
उगिच अशांची आशा धरुनी
क्लेश फुकाचे वाढविले !

क्लेश तिचे हे असह्य होउन
सर्वस्वातें अर्पुनियां
स्वतंत्रतेचें शिंग फुंकिलें
परसत्तेला उलथाया

धन्य जाहले पुत्र तिचे या
समरीं वांटा उचलोनी
गातच बसलों परंतु मी हा
उदास अजुनी या विजनीं !

हीच व्यथा रे हृदयीं सलते
मीनापरि मन तळमळतें
परवशतेचें भूत भयानक
समोंवतीं अन् घुटमळतें !

आणि वाटतें असेंच जावें
परसत्तेशीं झुंजाया
लढतां लढतां हास्यमुखानें
घाव पाशवी झेलाया !

धडपडतें मन तळमळतें अन्
दुर्बलता परि जाणवते
चमकुनि जातां वीज अचानक
ग्लानि अनामिक क्षण येते !

मात करीलच या ग्लानीवर
उधाणलेली नव दीप्ती
मातृभूमिला अर्पुन जीवन
मिळविन निश्चित अन् तृप्ती !

❋ ❋ ❋

दा. क्र. १४०६

## गा कविराया–

गा कविराया गात रहा
मम हृदयझुला झुलवीत रहा

तव कवनांचे सान्द्र मधुर स्वन
कोरिति लेणीं कणाकणांतुन
सौन्दर्याचा साक्षात्कारच
असें शिल्प निर्मीत रहा

निळी गोबरी वरुनि प्रेरणा
हरखलि हिरवळ, फुलिलि कामना
तुझ्या मोहनीं मुग्ध भावना
भावशाहिरा गात रहा

रोमांचित तनु तृषार्त मानस
तव किमयेचा सोम सुधारस–
अनुपम, अमृत कविराया तूं
भरुनि घडे पाजीत रहा

अणु अणु येथिल अबीर बनला
फुटले पाझर वांझ कातळा
निर्झर क्षणभर गती विसरला
गा कविराया गात रहा !

सलणारें जें सर्व संपलें
गाण्यांत जिणें जड विरघळलें
नव संजीवन तव रसनेंतुन
वितरित अविरत गात रहा

नवरस प्रसवूं दे प्रतिभेंतुन
तृप्त वासना तन्मय मन्मन
अपूर्व पूर्ति, तृप्त चराचर
तृप्त तृप्तिही, गात रहा

# जगायचें ' उद्यां ' साठीं

चांदण्यांत भाजे अंग
झाली शांतता वैरीण
आज घुमेना पारवा
सारें निस्तब्ध भयाण

रात कांपते काबरी
शून्यतेंत उसासून
दाटलेले अश्रु वारा
लपवितो पानांतून

ऐन चैत्रांत पिंपळ
जीवनाला विटलेला
मंदिराची जवळिक
तरी चांफा रोडावला

आटतांच ओहळाची
आटली ग शुद्ध प्रीत
रातकिडयांच्या कंठांत
अस्पष्टलें प्रेमगीत

वाट ओढीत चालली
मोडलेल्या कंबरेला
कुणीतरी डिवचलें
धांवणाऱ्या नागिणीला

चोवीस ...

मन शोधी अवकाशीं
काय शोधीतें कळेना
अलिप्तसें आज भासे
चित्त कशांत रमेना

चित्त कशांत रमेना
हरवलें गवसेना
गवसलें आकळेना
मन निवान्त राहीना

भुतापरी भिवविती
प्रकाशांत आज छाया
नको जाऊं बावरून
सखे, आकाशाची माया

नभ गर्भार जपतें
स्वप्न अंतरीं उषेचें
म्हणून ही धडपड
स्वप्नासाठीं जगायचे !

जगायचें 'उद्यां'साठीं
'उषे'साठीं जगायचें
पिकलेलें पान जसें
एकदिन गळायचें !

# मुसाफिर मी–

मुसाफीर मी भटकत आहें
जीवनांतल्या वनांत रे
आणि आजवर अविरत मन हें
जीवाला शोधीत फिरे !

पिशापरी ही किती पायपिट
कष्टचि ते तत्त्वपालनीं
मोह भुलवितो कांचनमृगसा
एकनिष्ठ मी तरि अजुनी

दावानल वन जाळित येतो
मागुन, मजला माहित हें
नश्वर सारें नकली जळुनि
सत्य चिरन्तन उरताहे

याच आगिच्या ज्वाला प्राशुन
भावहि जीवास्तव देतों
आस एक उरिं जागृत, म्हणुनी
उदासीन जीवन जगतों

दुरितें जाळुन विझेल वणवा
वनवासहि संपुन जातां
दोन जिवांचें घडेल मीलन
आस एक रे, ही आतां

※ ※ ※

# कृष्ण काजळी रात

कृष्ण काजळी
रात अमेची
अन् चमचमत्या
ताऱ्यांचा तो
प्रकाश धूसर
आणि त्यांतही
किर्र किरकिर
रातकिडयांची.
उदास असल्या
कातरवेळीं
अंथरुणावर
तळमळतें मन.

कृष्ण घनांनीं
झांकळलेल्या
निळ्या नभापरि
उगाच का आजि
उदास वाटे
जिवास माझ्या
आणि तळमळे
जळावेगळ्या

माशापरि तें
व्यग्रतेंमधीं
सुखावणारें
चंचल मम मन !

नको सौख्य मज
नको चैन ही
असा विरागी
झालों का पण
अकालींच नी
गूढतेंत मज
गुंग होउनी
कां जावेंसें
पुन्हां पुन्हां तें
हृदयीं वाटुन
शून्यांतच कां
रमतें हें मन ?

मिण मिण जळते
पणती इवली
मिणमिण पण ती
जळतच असते
जळतां जळतां

प्रकाश जगता
निस्वार्थानें
अर्पायाच्या
करीत यत्ना
मलाच कां मग
ध्यास अवेळीं
मिटावयाचा ?
मावळण्याचा—
समर्पणाविण
मावळण्याचा ?

※ ※ ※

# निर्मितीचे रावे

शब्दांचे फुटले पंख
स्मृतींच्या सुरवंटांना
तुटला ग कोष आज
पाखरास राहवेना

अभ्रें सारीं वितळलीं
निळी आभा उजळते
स्वप्नसौख्य रोमरोमीं
ऊर्मी नवी उमलते

चांदण्याची जादूगिरी
अंग अंगीं अंकुरली
गारव्याची हुरहूर
मनोमन मोहरली

केवडयाच्या आठवानें
मन माझें धुंद कुंद
तुटले ग सारे पाश
सुटले जगाचे बंध

सभोवतीं हवीशीच
वाटे रेशमी गुंफण
उफाळत्या आठवणी
भूत झाला वर्तमान

भूत झाला वर्तमान
भविष्यास धरूं धांवे
घोटाळती अवकाशीं
नव्या निर्मितींचे रावे

❋ ❋ ❋

## मूल

मूल
हांसरें फूल
उद्यांच्या वाटचालिची चाहूल
विज्ञानाच्या उंबरठ्यावर
जिज्ञासेचें पाऊल

❋ ❋ ❋

## विजनवास

हें कसलें अमुचें जिणें सख्यांनो
खडतर हा वनवास
तिथें मूक्तिचा गोव्यांत सोहळा
आम्हांस विजनवास

❋ ❋ ❋

# तुझ्याचसाठीं

तुझ्याचसाठीं स्वप्नसखे मी
असेंच अविरत झुरत रहावें
ओठांतिल तव मादक अमृत
धुंद होऊनी दुरुनच प्यावें

सादवणारे हिरवे रावे
विरहि पारवे आर्त घुमावे
प्रतीक्षेंतुनी हवी सफलता
हवें ओढाळ मनाला दावें

आलिंगन चुंबनाविना अन्
जीवन अपुलें तुडुंब व्हावें
तुडुंब होऊन तटिनीपरि तें
तडिल्लतेसम तळपत जावें

जडता विरुनी आदिकवींच्या
अनुष्टुभांतिल शब्द बनावें
तेज होऊनी तेजांत सखे
सहज सुखें अन् मिसळून जावें

क्रमांक ......१६५५५...... नोंद दि: ......३.३.६५

# माझें गोव्यांत माहेर

माझे वडील कुबेर
दिला रत्नांचा अहेर
माझें गोव्यांत माहेर
माझें गोव्यांत माहेर

माझ्या माहेराची वाट
जाईजुईचा ग थाट
असा दर्वळ दर्वळ
बाई मावेना मनांत

असे नारळ मधाळ
कुळागरें काळींशार
माझ्या माहेराचें पाणी
त्याला अमृताची सर

लावतांना सांजवात
आई मला आठवते
नदी भेटते सागरा
उगमाचा ध्यास घेते

माझे भाऊ भावजय
कृष्ण-रुक्मिणीचा जोडा
आला वसंत माघारा

मला माहेराचा ओढा
माझ्या मायेच्या माहेरीं
देव येतो पाहुणेरा
अजुनीही चालविते
चांगुणेची परंपरा

* * *

# प्रतिज्ञा

थाप डफावर पडलि कडाडून
थाप डफावर पडली
विजयाचे चौफेर चौघडे
झडले, नौबत झडली
ज्वालामुखि भडकला हिमांतुन
जनता पेटुन उठली
करंटाच जो राहिल मागें
अबलाहि सरसावली
गर्जत हरहर शिव हर शंकर
झुंज देऊं बलशाली
स्वातंत्र्याच्या यज्ञ स्थंडिलीं
काया समिधा बनली
देवभूमिवर– हिमालयावर
ये शौर्याला उकळी
या भूमींतुन चिन्यांस हटवूं
आज प्रतिज्ञा पहिली
दास न होऊं कुणाचेहि, जरि
प्राणज्योत मालवली
मालवणारी ज्योत पेटविल
चाळिस कोटि मशाली

## ही जत्रा–

ही जत्रा
सतरा जातींच्या
अठरा माणसांची
हौशांची, नवशांची, गवशांची.

ही जत्रा–
धक्के देणारांची
धक्के खाणारांची
लुबाडणाऱ्यांची
लुबाडून घेणाऱ्यांची

ही जत्रा–
रोज हजारों रुपयांच्या
सहज घडामोडी करणाऱ्या
व्यापाऱ्यांची,
केवळ हौसेसाठीं
घामाच्या पैशाचें
पाणी करणाऱ्या
गिऱ्हाइकांची.
भेळवाला, गंडेरीवाला,
खेळणींवाला, पाळणेवाला
चाय्वाला, चणेवाला,

मिठाईवाला, मालवणी खाज्यावाला
सोडतवाला, जुगारवाला,
पितळवाला, स्टीलवाला
फुलवाला, फुगेवाला,
पांगळे, थोटे, आंधळे, बहिरे,
छोटे, मोठे, म्हाल म्हातारे,
सलज्ज, कुजबुजणाऱ्या
तरुण–तरुणी,
सतत पिरपिरणारीं, केंकाटणारीं
पोरें सोरें,
या साऱ्यांची

ही जत्रा–
या जत्रेंत
असलेल्या ओळखी
वाढतात,
नसलेल्या
होतात.
क्षणभर, माणसें
एकत्र येतात,
बोलणारीं बोलतात,
हंसणारीं हंसतात
माझ्यासारखीं

... सदर्तास

तऱ्हेवाईक माणसें
तिऱ्हाइतासारखीं
कोंपऱ्यांत बसतात.
कुणी हौस करतात,
कुणी मौज पहातात,
नुसतीच.

ही जत्रा—
देवळाची
देवळाच्या आवाराची
आवारांतल्या दुकानांची
दुकानदारांची
ही जत्रा माणसांची

ही जत्रा—
ही जत्रा सर्वांचीच
पण देवाची नव्हे
ह्या जत्रेंत सारें आहे, पण
देव नाहीं...
त्याच्यावांचून कुणाचें
अडत नाहीं.
येतांना माणसें येतात,
एक एक करून
लांब लांबून

देवासाठीं—
देवाच्या दर्शनासाठीं म्हणून
चार ठिकाणचे, चार जण,
एकत्र येतात, खूप बोलतात,
हौस मौज करतात,
धक्का बुक्की,
चेंगराचेंगरी
यांतून कसा बसा मार्ग काढीत
एक एक करून निघून जातात.

जुनीं जातात,
नवीं येतात,
जत्रा आपली चालूंच असते.
जातां जातां कुणीतरी,
कुठें तरी
हळूच कुजबुजतें,

' ही जत्रा ' हेंच एक
नाटक होतें,
थोतांड होतें,
म्हणणारें म्हणून जातें
जत्रा आपली चालूच राहते.

ही जत्रा,
सतरा जातींच्या
अठरा माणसांची,
हौशांची, नवशांची
—आणि गवशांची !

※ ※ ※

## स्वप्न–

वेण येतात
वीण होते
नवीन जीवन
आकार घेतें
आणि पहातें
स्वप्नें....
फक्त स्वप्नेंच.

सोनेरी रंगाचीं
चंदेरी जादूचीं
अभ्रकी वर्खाचीं
पांखरांच्या पंखांचीं
नाना प्रकाराचीं

पहातां पहातां विरतात
वारा होऊन जातात
आणि हातांत ?
—हातांत उरतो वाराच
पण—
प्राण मात्र
वेडा

शोधतो
नवीन शरीर,
नवीन स्वप्नें
पहाण्यासाठीं

※ ※ ※

## माझ्या या घरांत

माझ्या ह्या घरांत
मीच निर्वासित
हरवलें चित्त
तुजपाशीं.

आलास गेलास
विजेचा आभास
बकुळ उदास
कोमेजली.

सकाळच्या पारीं
जळते दुपार
रावा गेला दूर
मैनाईचा

※ ※ ※

## चैत्र माज–

तूं जळणारी दुपार होऊन
आलिस अमुच्या घरीं
विझलिस माझ्या कुशींत जशि कां
शुक्लांतिल शर्वरी !

संगोत्सुक कुणि, कुणि ऋतुस्नाता
रतिरत कुंजवनांत
भलते छेडित छंद कुणी तरि
धुंद गीत गातात

खग युगुलें कैफांत जागविति
चांदरात चंदनी
ऊर्मि एकमय, अभिन्न काया
नागयुग्म उन्मनी !

रंगोत्सविं या स्वैर अनावर
उन्मीलित शृंगार
चराचरांतुन संचारतो स्मर
चेतवीत अंगार !

फुलारलेला चैत्रमाज अन्
उन्मादक एकान्त
आतुर तूं अन् आतुर मीही
–सहजच मग एकान्त !

# नको शापूंस माऊली

त्याच्या वासनांचें फळ
भुंगा गेला लांबवर
फूल कुणाचें–कुणाचें
चल वेलीस विचार.

नको म्हणूं पाप त्यास
वेध जिथें फुलण्याचे
स्वप्न गर्भांत उद्यांच्या
उगवत्या प्रेषिताचें.

वेदनेच्या अंकुरास
आशिर्वाद अनन्ताचा
आसवांतून स्वातीच्या
मळा नक्षत्र मोत्यांचा

नको राहूंस उदास
निर्मितीच्या दिव्य क्षणीं
भांगेतली तुळसही
मोहरावी मंजि-यांनीं

गंगा गहिंवरलेली
पापण्यांच्या कांठोकांठ
नको सांडूंस तीर्थ तें
झेलीन मी ओंजळींत

तुझ्या उच्छ्वासाची धग
लंका सोन्याची जाळील
गर्भवतीच्या शापानें
कोंभ कोंभ करपेल

तुझ्या शब्दांत सामर्थ्य
अहिल्येच्या सुकृतांचें
नको शापूंस माऊली
पुण्य आटेल पिढ्यांचें !

※ ※ ※

# विश्वाचा कोश

विश्वाचा कोश माझ्या हातांत आहे,
पान न् पान मी चाळतों आहें
आज मी विश्वांत असून
विश्वाच्या बाहेर आहे.
पुण्याच्या पापुद्र्याखालीं लपलेलें पाप
मी पहात आहें.
वेश्येच्या घरांत अजून महानंदा
व्रतस्थ आहे.

सती अहल्या शापित आहे,
आणि इंद्र मात्र
अजूनहि अप्सरांच्या स्वर्गांत
उजळ माथ्यानें मिरवतो आहे
शृंगारांत मग्न आहे,
हें सगळें मी पहात आहें,
पचवीत आहें,
आणि आज माझी वैखरी
ॐकारांतून रुजते आहे
उमलविण्यासाठीं उन्मेषाचे मळे
विषाचें खत घालून
अमृताची फुलबाग फुलवणारा

मी माळी आहें.
आज मी विश्वांत असून
विश्वाच्या बाहेर आहें
विश्वाहून वेगळा आहें.

❋ ❋ ❋

## चंचल ?

आषाढी पुनवेच्या
आकाशाप्रमाणं
तुझ्या चेहऱ्यावरचा
कधीं हसवा
कधीं रुसवा
पाहून
माझ्या मनींचा एक पारवा
हळूच तुझ्या दिशेनं झेपावतो
—तिला चुकवून !

❋ ❋ ❋

# किती पाहूं वाट

रात्रीच्या व्यथंन
खिरलें चंदन
तुझें आगमन
होईल का ?

संगीताची धून
धुंद आसमंत
रिघावा मनांत–
चैतन्याचा

क्षितिजापर्यंत
परागाची वाट
पाहूं किती वाट
आतुरलें.

तुजसाठीं लेणें
अहेवाचें लेणें
तुझें व्हावें येणें
अकस्मात

क्षण गात्रगात्रीं
फुलावी पुनव
विरावें आस्तित्व
उत्सवांत.

## वाऱ्यावरच्या भंवरा

वाऱ्यावरच्या भंवरा,
ए वाऱ्यावरच्या भंवरा
विरहव्याकुळा कमळण वेडी
हाक मारिते तुला, चतुरा,

आजुबाजुला हिरवें वैभव
जलवन्तीचे हंसरे आर्जव
अन् मीनाचें नटवें लाघव
तुझ्याचसाठीं निळ्या जगांतुन
बघ झरति सुधेच्या धारा

अमृतमंगल आज सोहळा
अधीर अवनी विरहव्याकुळा
सुमशर सोडित अनंग आला
खट्याळ चाळा करि पदराशीं
येउनि, कुणि झणीं यास आवरा

शिशिरामधली नीरव शान्ती
बावरलेली या एकान्तीं
कुमारिका मी इथें एकटी
अशा अवेळीं करूं नको हं
तूं भलतें साहस मनोहरा !

* * *

# स्वतंत्रते तुजसाठीं

मांडविच्या कांठावर
फडफडतो राष्ट्रध्वज
मुक्त आज मातृभूमि
गोमंतक मुक्त आज

देवांची वसति इथें
सरस्वती वावरते
या नंदनवन-भूवनि
स्वागत तव स्वतंत्रते

हर्षसागरा उधाण
तूं महान मी लहान
हरखुन परि गाईन मी
तुजसाठीं दिव्य गान

शरिराच्या पायघड्या
पंचप्राण पंचारति
सहजगात वेदगान
शब्द शब्द उजवाती
स्वतंत्रते तुजसाठीं

* * *

# रेशीम धागा

शक्तीच्या सामर्थ्यावर
तटातट
दोरखंड देखील तोडणारा मी
एक साधा रेशीम धागा
मला तोडतां आला असता
तर....

तर कदाचित
तूं सुखी झाली असतीस
आणि मी ?
माझं काय ?
माझी ही जमीनवेडी
सुकाणूशिवाय होडी
मग भटकत फिरेल

जुन्या आठवणींत खुषालून
पुढचं सारं हंसत सोशीत
कुठेंतरी, कशीतरी
किनारा शोधीत
निवारा शोधीत

# अंकुर

एक लहानसं बीज
त्याचं लहानसं होतं जग
होती सुखाची शेज
त्याला झोंपायचंच वेड
तें अंधारांत जन्मलें
अंधारांत वाढलं
आणि
अंधारांतच मावळलं
त्यानं प्रकाश पाहिला नाहीं.

असंच दुसरं छोटंसं बीज
त्याचंहि होतं छोटंसं जग
होती सुखाची शेज
पण तें लहानसं जग
होतं त्याच्यासाठीं अगदींच लहान
नव्हतं सुख त्याचं
त्या सुखाच्या शेजेंत
त्याचीं आभाळाएवढीं स्वप्नं
मावत नव्हतीं त्या टिचभर दुनियेंत
त्याचे वेध रुजण्याचे,
वेड वाढण्याचे.

एक दिवस सारी शक्ति एकवटून
अंधाराचा कोश फाडून
तें बाहेर आलं
आणि
त्यानं प्रकाश पाहिला
त्या प्रकाशाचा कण न् कण
त्यानं पिऊन घेतला
सांठवून ठेवला
सांठवत राहिलं––
तेव्हांपासून तो अकुंर
वाढूं लागला
वाढत राहिला.

***

# एकच रेखा

काजळलेल्या झाडावरती
कितिक काजवे चमचमती
मनोमंदिरीं परंतु माझ्या
एकच रेखा मिणमिणती

एकच रेखा, एकच आशा
ना अभिलाषा अन्य मला
स्नेहवात ही तुझ्याचसाठीं
एक तुझा रे ध्यास मला

मंदिर आहे रितें तुझ्याविण
शोधितांहि तूं गवसेना
महानतेची तहान माझी
मृगजळ परि तें फसवि मना

ऊन सावल्या खेळ जगाचे
पाहत साहत वावरतों
भयाण वारे वादळांतहि
ज्योत तेवती रे जपतों

जाणिव माझ्या उणिवांची मज
नेणिवेंत परि धडपडणें
अशांत जीवन तुजविण अवघें
विझेल तोंवर वावरणें

क्रमांक नों दि ..............

# एकच उणीव

आज अन्तरीं उमले माझ्या
चैतन्याची नवीन ऊर्मी
शब्द संपले, भावच उरले
उलसित तनु मन तन्मयसा मी

हिरवी सृष्टी मन हें हिरवें
निळी शितळता वरुनि पाझरे
मौनांतुन स्वन-गुंजन झरतें
अंतर्मुख अजि हृदय झरे

मृदुल-रेशमी हिरवळ श्यामल
नवथर जाणिव तृणास तरण्या
स्वर्ग धरेवर आज लिहितसे
गोड मधुरशा प्रीत लावण्या

निशिगंधाचा वेध घेतसे
लाजाळूची जाग अवेळीं
चंद्रकरांचा स्पर्श सुखदसा
कुंवार कर्दळ पुरी लाजली

रे असल्या या वातावरणीं
उणीव एकच अंतरिं सलते
इथें एकलीच भोळी राधा
तिचा कन्हैया गेला कोठें ?

❋ ❋ ❋

# पुण्य आणि पाप

मी पाहिलें,
समोर झगझगीत प्रकाशांत
लावण्यसंपन्न असें ' पुण्य ' उभें होतें
लगेच
शरमेनें मी
मान खालीं घातली.
कारण
कां कुणास ठाऊक,
पुण्याकडे पहाताना
माझ्या मनांत
पाप आलें.

# जीवनस्मृतिंची मधुर सांठवण

आज मन्मनीं गोड गोडसें
कसलें मन्थन ? कसलें काहुर ?
नकळत हंसते आज अबोली
नसांनसांतुन कसली हुरहुर ?
प्राणपांखरा ओढ कशाची
गुणगुणतें कां नवी स्वराली ?
नेत्रदलांच्या कुशिंत सुखावलि
स्वप्नतरलता पल्वलांतली
शिरशीरते अन् रोमांचांतुन
विद्युत्-रेखा भाद्रपदांतिल
मोरपिसाच्या स्पर्शसुखाची
अणुरेणूंतुन फुलली चाहुल
स्वर जरतारी लाजरि लवलव
आज झिरपते शरिर-विणेंतुन
सुस्तींतिल या सुखद धुंदिंतुन
सहजच येते तुझी आठवण
जीवन नूतन उसळी घेतें
गतकाळाच्या अथांगतेंतुन
ओसरतां जल पुलिनिं फेनसी
केवळ उरते तुझिच आठवण

पुलिनिं फेनसी तुझी आठवण
विरतां विरतां करिते गुंजन
सरतां गुंजन, नव संजीवन
जीवनस्मृतिंची मधुर सांत्वण

* * *

## कातरवेळ

मागें मागें रेंगाळती
कांहीं किरणें चुकार
धुवारल्या दाही दिशा
रंग रंग एकंकार
ज्ञात अज्ञाताची सीमा
मिटूं आले नेत्र नेत्र
जाणीवेच्या पलीकडे
सारा अंधार अंधार
सभोवतीं किण्ण सारें
नाहीं कुणाचा सांगात
आणि माझें असणेंच
हारपतें अनंतांत

* * *

क्रमांक .................... नों. दि. ..................

# आकाशाचे अश्रु पिऊन

हुंदका आवरून
चेहऱ्यावर चांदणें फुलवीत
साऱ्या जगावर मायेची पांखर घालणारें
आकाश देखील
वैशाखांतल्या असह्य उन्हानें
करपून निघणाऱ्या,
होरपळणाऱ्या
पृथ्वीकडे पाहून
क्षणांत कोमेजतें,
भरून येतें
अन्तर्यामीं
उकळणाऱ्या लाव्हानं
लासणाऱ्या धरेवर
हास्य उमलतें
आकाशाचे अश्रू पिऊन
क्षणांत तिचें मन
खुषालतं, सुखावतें,
निर्मितीचा ध्यास घेऊन
हिरवीं स्वप्नें पाहूं लागतें.

❋ ❋ ❋

# तुझी याद येते–

तुझी याद येते...
तुझी याद येते
आणि मनांत माझ्या
भलते येतें
भलते 'सलतें'
त्या सलण्यांतहि
तुझें अस्तित्व जाणवतें
तें तुझें वागणें...
तें मीलन
जें कधीं घडलेंच नाहीं
अंधारांतिल मदिरेंत
घोळुन निघालेलं तें तुझें बोलणें
जें तूं कधीं बोललीच नाहींस
नेमकें तेंच आठवतें
सतावतें
येऊं नये तें मनांत येतें !

❋ ❋ ❋

# सारस्वत तूं

सारस्वत तूं, सारस्वत तूं
नव्या युगाचा वैवस्वत तूं

संहारास्तव प्रेषित तूं
प्रेषित तूं देवाघरचा
सृजनास्तव प्रलयानंतर
प्रलयंकर तूं उदयंकर तूं

शस्त्रलेखणी संहारक
उद्धारक अस्त्र वाणिचें
युगांयुगांच्या पौरुषास
स्वीकारलेंस आव्हान तूं

शोषकांस जणुं सैतानच
शापितांस उःशाप तूं
मानव्याचा संरक्षक
नव्या मनूचा निर्माणक तूं

❋❋❋

# कोण तूं स्वैरिणी ?

मूर्त मदनाची मोहिनी
कोण तूं स्वैरिणी
जशी रोहिणी
करुनि शिणगार ?

चाललिस कुठं झोकांत
कबुतरी डौलांत
कुणाचं भाग्य
आज फळणार ?

नजरेंतुन अमृत जहरी
सांभाळिं ग पोरी
कुणा बघ्याची
करशील शिकार

ठरेना पदर छातीवर
उडतो वाऱ्यावर
सांवर, सांवर
मारशील ठार !

※※※

वासष्ठ ...

वि: ....काव्य.
क्रमांक ... ९६५५ नों दि ....... ३.३.६५

# जिथें मांडवी... जिथें जिव्हाळा

गोवा माझा स्वतंत्र झाला !
स्वतंत्र झाला ! स्वतंत्र झाला ! !
वाजव तासे झांजा घुमटें
मुक्त रवानें घुमवित गीतें
सांग सरऱ्यारे सांग जगाला
'गोवा माझा स्वतंत्र झाला !'

आज दिवाळी, आज पाडवा
गुढ्या उभारा, घर घर सजवा
अबीर उधळित, करूं सोहळा–
गोवा माझा स्वतंत्र झाला !

आज निरागस हंसतें प्राक्तन
अज्ञातांतुन उज्वल यौवन
देव हांसतो पूर्व दिशेला
'गोवा माझा स्वतंत्र झाला !'

रसवन्ती थयथयां नाचते
उजवाडाशीं जोडित नातें
शब्द-समुद्रा येइ उमाळा
गोवा माझा स्वतंत्र झाला !

जिथें इगर्जा, जिथें मंदिरें,
सह्याद्रीचीं पवित्र शिखरें
जिथली माती प्रसाद मजला
गोवा माझा स्वतंत्र झाला !

प्रसन्न सुंदरतेचा राजा
कलावंत गोमांतक माझा
जिथें जिव्हाळा....ओढ जिवाला
गोवा माझा स्वतंत्र झाला !

※※※

## हंसणारे हंसूं देत

हंसणारे हंसूं देत
हेंच वय तुझं माझं
प्रेमरंगीं रंगण्याचं
एकमेकां लुटण्याचं

REFBK-0014066
REFBK-0014066

लाल रंग रंगवावा
तसा हिव्याचि मेंदीनं
विडा होऊन रंगावं
पिकण्यापूर्वी पानानं

※※※